**University of Mumbai** सांख्यिकी कक्ष, फोर्ट

मुंबई – ४०० ०३२.

दूरध्वनी क्र. 022-2270 8738
022-2261 8987
Email Id :- supt.statunit@gmail.com

## UDSTAT/ICD/2017-18/ 104 of 2017

परिपत्रक :-

विषय : शैक्षणिक वर्ष २०१७-१८ या वर्षाकरीता ऑनलाईन विद्यार्थी संख्या बाबतची (Student on roll www.eoffice.mu.ac.in/statistical) माहिती नोंदविणेबाबत. (दिनांक ३० संप्टेबर २०१७ नुसार)

महोदय/महोदया,

मुंबई विद्यापीठातील सर्व विभाग प्रमुख व विद्यापीठ संलग्नीत महाविद्यालये, स्वायत्तता महाविद्यालये व संस्था यांचे प्राचार्य व संस्था प्रमुख यांचे उपरोल्लेखित केलेल्या विषयाकडे आपले लक्ष वेधू इच्छितो कि, शैक्षणिक वर्ष २०१७-१८ या वर्षाकरीता विचारण्यात आलेले विद्यार्थी संख्या बाबतची ऑनलाईन माहिती अत्यंत महत्वाची असल्याकारणाने विद्यापीठाच्या www.eoffice.mu.ac.in/statistical या संकेतस्थळावर (web portal) उपलब्ध असून ती तात्काळ दिलेल्या विवरण पत्रानुसार (formats) भरण्यात यावी.

सदर विद्यार्थी संख्येबाबतची माहिती विद्यापीठ आयोग, भारतीय विश्वविद्यालय संघ, केंद्रशासन, उच्चशिक्षण व तंत्रशिक्षण विभाग, महाराष्ट्र शासन, मुंबई संचालनालय, उच्च शिक्षण, पुणे, सह-संचालनालय, उच्च शिक्षण, मुंबई विभाग, इत्यादी महत्वाच्या शासकिय नियंत्रक संस्था/विभाग यांना आवश्यक असलेले महत्वाची माहिती सर्व संबंधित शासकिय विभागांना ठराविक कालावधीत देणे. त्याचप्रमाणे माहितीच्या अधिकारांतर्गत विचारण्यात आलेल्या विविध माहितीच्या सदरा खालील आवश्यक ती माहिती सुद्धा सादर करणे अनिवार्य असल्यामुळे ती आपल्या संस्थेमार्फत प्रति शैक्षणिक वर्षानुसार दिलेल्या विवरण पत्रानुसार (formats) ऑनलाईन माहिती संकेतस्थळाच्या माध्यमातुन कक्षास सादर करणे अत्यंत गरजेचे व सक्तीचे आहे, याची कृपया आपण नोंद घ्यावी.

उपरोक्त सर्व सारांश लक्षात घेता आपणांस विदित करण्यात येते कि, शैक्षणिक वर्ष २०१७-१८ या वर्षाकरीता अत्यावश्यक असलेली विद्यार्थी संख्येबाबतची ऑनलाईन माहिती ही दिलेल्या सर्व विवरण पत्रानुसार (Including Temporary Teaching/Non-Teaching staff) (formats) अचूकतेने व विनाविलंब भरण्याविषयीची सुचना आपल्या अधिपत्याखालील असलेले नोडल अधिकारी व संबंधित कर्मचारी वर्ग यांना देण्यात यावी. त्याचप्रमाणे सदरची माहिती भरल्यानंतर प्रमाणपत्राामध्ये महाविद्यालयीन शिक्का व आपल्या सहीने परिपुर्ण असलेले प्रमाणपत्र/हमीपत्र सांख्यिकी कक्षास सादर केल्याशिवाय महाविद्यालय/संस्था यांच्यामार्फत येणारे परिक्षा अर्ज (Exam form), नोंदणीअर्ज (Enrollment form), महाविद्यालयीन संलग्नता (Continuation/Extension), प्राचार्य व शिक्षक मान्यता (Approval), जाहिरात-मसुदा व बिंदुनामावली इ. गोष्टी तपासली जाणार नाहीत, याची आपण आपल्या उच्च स्तरावर नोंद घ्यावी.

त्याचप्रमाणे सदरची संबंधित ऑनलाईन माहिती भरतांना काही समस्या/अडचणी उद्भवल्यास अधिक्षक, सांख्यिकी कक्ष, दुसरा मजला, खोली क्रं २०२ येथे कार्यालयीन कामकाजाच्या वेळेत प्रत्यक्ष भेट घेऊन संबंधित माहिती विषयी जाणकारी/मार्गदर्शन करून घेणे अथवा ०२२-२२७०८७३८/२२६१८९८७ या दुरध्वनी क्रमांकावर संपर्क साधावा, जेणे करून विचारण्यात आलेली ऑनलाईन माहिती योग्य वेळेत, विनांविलंब, अचूकतेने पुढील योग्य त्या कार्यालयीन कार्यवाहीसाठी सादर करता येईल, याची नोंद असावी.



Scanned by CamScanner

# University of Mumbai



(टिप्पणी :- सर्व संबंधिताना विचारण्यात आलेली ऑनलाईन माहिती भरून झाल्यानंतर त्याबाबतचे हमीपत्र /प्रमाणपत्र भरून मुंबई विद्यापीठ सांख्यिकी कक्ष, फोर्ट, यांच्याकडून ना-हरकत प्रमाणपत्र (No Objection Certificate) घ्यावे.)

नोडल अधिकारी
(AISHE/MIS)

मुंबई : ४०००३२
दिनांक : ०३ नोव्हेंबर, २०१७

प्रतः-

मुंबई विद्यापीठतील सर्व विभाग प्रमुख व विद्यापीठ संलग्नित महाविद्यालये, स्वायत्तता महाविद्यालये व संस्था यांचे प्राचार्य व संस्था प्रमुख यांच्या पुढील योग्य त्या कार्यवाहीसाठी व माहितीसाठी अग्रेषित.

प्रत माहिती व योग्य त्या कार्यवाही करीता रवानाः-

१. संचालक, शिक्षण संचालनालय, उच्च शिक्षण,मध्यवर्ती इमारत पुणे-४११ ००१.
२. परीक्षा नियंत्रक, परीक्षा विभाग, मुबंई विद्यापीठ, विद्यानगरी, सांताक्रुझ (पूर्व), मुंबई-४०० ०९८.
३. उपकुलसचिव, संलग्नता विभाग, मुबंई विद्यापीठ, फोर्ट, मुंबई- ४०००३२.
४. उपकुलसचिव, घटक महाविद्यालये, मुबंई विद्यापीठ, फोर्ट, मुंबई- ४०००३२.
५. उपकुलसचिव, पदव्युत्तर विभाग, मुबंई विद्यापीठ, फोर्ट, मुंबई- ४०००३२.
६. उपकुलसचिव, विशेष कक्ष, मुबंई विद्यापीठ, फोर्ट, मुंबई- ४०००३२.
७. उपकुलसचिव, नाव नोंदणी विभाग, मुबंई विद्यापीठ, विद्यानगरी, सांताक्रुझ, (पूर्व),मुंबई-४०० ०९८.
८. अधिक्षक, आवक विभाग, मुबंई विद्यापीठ, फोर्ट, मुंबई- ४०००३२.
९. अधिक्षक, आवक विभाग, मुबंई विद्यापीठ, विद्यानगरी, सांताक्रुझ (पूर्व),मुंबई-४०० ०९८.

**यांना असे कळविण्यात येते की, विद्यार्थी संख्या (Students on Roll) बाबतची माहिती विद्यापीठ विभाग व संलग्न महाविद्यालये व मान्यता प्राप्त संस्था यांनी भरणे अनिवार्य असून सदर माहिती न भरल्यास त्या विभागाचे/महाविद्यालय/संस्थेच्या विद्यार्थ्यांचे परिक्षा अर्ज (Exam.Form) नोंदणी अर्ज (Enrollment Form) महाविद्यालयाची संलग्नता (Continuation/Extension)/प्राचार्य/शिक्षकमान्यता(Approval) व महाविद्यालये/संस्थांचे कोणतेही पत्रव्यवहार स्विकारू नयेत. तसेच जाहिरात, मसुदा, बिदुंनामावली तपासणी करू नये. असे आदेश मा. संचालक, संचालनालय, उच्चशिक्षण विभाग, पुणे, व मा. कुलगुरू, मुंबई विद्यापीठ, यांनी दिलेला असून त्याप्रमाणे प्रत्येक विद्यापीठ विभाग/संलग्न महाविद्यालये व मान्यता प्राप्त संस्थेकडून त्याबाबतचे प्रमाणपत्राची छायांकित प्रत संबंधितांकडून घेण्यात यावी व त्यानंतर पुढील कार्यालयीन कार्यवाही करावी.**

नोडल अधिकारी
(AISHE/MIS)

Scanned by CamScanner